 **वारस.किरकोळ.अर्ज.क्र.९८/२०२१**
सीएनआर क्र.एमएचएएच०८००२२२९-२०२१

## निशाणी क्र.२१ वरील आदेश

त्रयस्थ इसम नामे अश्विनी गणेश बिडवे, चैतन्य गणेश बिडवे व अभिषेक गणेश बिडवे यांनी सदरचा अर्ज त्यांना प्रस्तुत चौकशी अर्जाकामी पक्षकार म्हणुन सामिल करुन घ्यावे याकरीता दाखल केला आहे.

२. त्रयस्थ इसमांचे अर्जातील कथन थोडक्यात असे :- मुळ अर्जदाराने बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट कलम २ प्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळणेकरीता दाखल केला आहे. मयत सुर्यभान सोनबा बिडवे व मयत सुनिता सुर्यभान बिडवे यांचे कायदेशीर वारस म्हणुन सर्व आवश्यक वारसांना सदर अर्जामध्ये मुळ अर्जदाराने सामील केलेले नाही. सुर्यभान हे दिनांक २३/१२/२०१४ रोजी व सुनिता बिडवे हि दिनांक २२/०९/२०१७ रोजी मयत झाले आहेत, त्यांना मुलगा गणेश व मुली नामे सिमा, सुनिता व ज्योती अशी अपत्ये आहेत. मुलगा गणेश हा दिनांक १०/१२/२००१ रोजी मयत झाला आहे, त्याला पत्नी अश्विनी व मुले नामे चैतन्य व अभिषेक असे कायदेशीर वारस आहेत. मुळ अर्जदारास सदरची माहिती असतांना गणेश यांचे वारसांचा हक्क डावलण्यासाठी तिने जाणीवपुर्वक न्यायालयाची दिशाभुल केली व मयत सुर्यभान व सुनिता यांचे वारसांना पक्षकार म्हणुन सामील केले नाही, त्यामुळे त्रयस्थ इसमांना पक्षकार म्हणून सामिल करुन घ्यावे तसेच त्यास म्हणणे मांडण्याची संधी देण्यात यावी व अर्ज मंजूर करण्यात यावा अशी विनंती त्यांनी केलेली आहे.

३. त्रयस्थ इसमाचे सदर अर्जास मुळ अर्जदार यांनी **नि. क्र. २७** वर म्हणणे दाखल करुन सक्त हरकत नोंदवली आहे. अर्जदार तिचे म्हणणे मध्ये असे कथन करते की, सदरचा अर्ज कायदेशीर नाही. मयत सुर्यभान व सुनिता यांना मुलगा गणेश व मुली नामे सिमा, ज्योती व सुनिता अशी अपत्ये आहेत. गणेश हा दिनांक १०/१२/२००१ रोजी मयत झाला, तसेच त्याला पत्नी अश्विनी व मुले नामे चैतन्य व अभिषेक असे कायदेशीर वारस आहेत. मयत सुर्यभान हे मिलिट्री मध्ये नोकरीस होते त्यामुळे मिलिट्री कायदयाप्रमाणे मयत व्यक्तीच्या कौंटुबिक निवृत्तीवेतन लाभ (फॅमिली पेन्शन) कोणाला मिळेल याबाबत स्पष्ट केलेले आहे. त्रयस्थ इसम हे सदर कायदयानुसार कौंटुबिक निवृत्तीवेतन लाभ (फॅमिली पेन्शन) मिळणेस पात्र नाहीत. सबब, अर्ज नामंजुर करण्यात यावा अशी विनंती अर्जदाराने केली आहे.

४. अर्ज, म्हणणे वाचले व दाखल कागदपत्रे पडताळून पाहीली असता असे दिसून येते की, मुळ

अर्जदाराने सदरचा अर्ज हा वारस प्रमाणपत्र मिळणेकरीता दाखल केला आहे. मुळ अर्जदाराने ती मतय सुर्यभान याची कायदेशीर वारस आहे. त्यामुळे वारस प्रमाणपत्र मिळावे अशी मागणी केली आहे. त्रयस्थ इसम हे मयत सुर्यभान व सुनिता यांचा मुलगा गणेश याचे कायदेशीर वारस आहेत ही बाब म्हणणे मध्ये कबुल केली आहे. त्रयस्थ इसम मयत सुर्यभान याचे सुन व नातवंडे आहेत. त्यामुळे ते देखील त्यांचे कायदेशीर वारस होतात. त्यामुळे अर्जदाराने त्यांना सदर अर्जाकामी पक्षकार म्हणुन सामील करून घ्यावे असा आदेश पारीत करणे न्यायोचित होईल असे मला वाटते. सबब, अर्ज मंजूर होणेस पात्र आहे त्याबाबतचा सविस्तर आदेश मी खालीलप्रमाणे पारीत करत आहे.

**आ दे श**

१. सदरचा अर्ज मंजुर करण्यात येत आहे.

२. अर्जदाराला असे आदेश देण्यात येत आहेत की, तिने त्रयस्थ इसम नामे अश्विनी गणेश बिडवे, चैतन्य गणेश बिडवे व अभिषेक गणेश बिडवे यांना सदर अर्जाकामी पक्षकार म्हणुन सामील करून घ्यावे व तशी दुरूस्ती अर्जात करावी.

३. खर्चाबाबत आदेश नाही.

Sangita Pundlik Babar
Digitally signed by Sangita Pundlik Babar
Date: 2023.12.08 17:15:19 +0530

(श्रीमती. एस. पी. बाबर)
३ रे सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर,
संगमनेर.

ठिकाण :- संगमनेर.
दिनांक :- ०८.१२.२०२३.